| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHKO110012972016 | प्रकरण दाखल दिनांक | : | १९/०८/२०१६ | | |
| | प्रकरण नोंदणी दिनांक | : | १९/०८/२०१६ | | |
| | निकाल दिनांक | : | १६/०३/२०२६ | | |
| | कालावधी | : | **व.** | **म.** | **दि.** |
| | | | ०९ | ०६ | २८ |

**<u>पेठ–वडगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात</u>**

**(पिठासीन अधिकारी जे.एन. भस्मे )**

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १६ मार्च, २०२६**

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४५८/२०१६)**
**(निशाणी क्र. ६५/ब )**

गुन्हा नोंद क्र.२२३/२०१५, वडगाव पोलीस ठाणे, जिल्हा – कोल्हापूर.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी / तक्रारदार** | : | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत वडगाव पोलीस ठाणे, जिल्हा – कोल्हापूर. |
| अभियोग पक्षातर्फे | : | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता**<br>श्रीमती. एस.आर. मोरे. |
| **आरोपी** | : | **शंकर विष्णू पांडागळे,**<br>वय वर्ष – ४२,<br>रा. आबांड, कुर्डुवाडी,<br>ता. कुर्डुवाडी, जि. सोलापूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | : | श्री. आर. डी. जुगळे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २८/०९/२०१५ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २८/०९/२०१५ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | १९/०८/२०१६ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :- | १८/११/२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १४/०८/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात. | :- | -- |

## आरोपीची माहिती

| **आरोपीचे नांव** | **अटक दिनांक** | **जामिनावर सोडल्याची दिनांक** | **गुन्ह्याचे कलम** | **अंतिम आदेश** | **शिक्षा** | **फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|
| **शंकर विष्णू पांडागळे** | १५/१०/२०१५ | १५/१०/२०१५ | भा.दं.सं. कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.का.कलम १८४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**अ. अभियोग पक्षातर्फे घेतलेले साक्षीदार :**

| **अ.सा.क्र.** | **साक्षीदाराचे नांव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | दयानंद बाळासो भोसले | पंच | **१४** |
| अ.सा.क्र.२ | खंडू गोविंद माने | साक्षीदार | **२७** |
| अ.सा.क्र.३ | लक्ष्मी पोपट माने | साक्षीदार | **३४** |
| अ.सा.क्र.४ | दिलीप बाबुराव माने | साक्षीदार | **३७** |
| अ.सा.क्र.५ | राहुल सुभाष खंडागळे | साक्षीदार | **४२** |
| अ.सा.क्र.६ | सुनिल भरत कोळी | तपासी अंमलदार | **५८** |

## ब. अभियोग पक्षातर्फे दिलेले निशाणी दस्तऐवज :

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ५९ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ६० | कलम २०९ ची नोटीसीची स्थळप्रत |
| ३. | ६१ | फिर्याद |
| ४. | ६२ | अटक पंचनामा |

## बचाव पक्षातर्फे घेतलेले साक्षीदार :

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | निरंक | **निरंक** | निरंक |

## बचाव पक्षातर्फे दिलेले निशाणी दस्तऐवज :

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार :

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | निरंक | **निरंक** | निरंक |

## न्यायालयामार्फत दिलेले निशाणी दस्तऐवज :

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | **निरंक** |

## न्यायालयामार्फत दिलेली निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १४ | **प्ली** |

**भौतिक वस्तु :**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | **निरंक** |

## न्या य नि र्ण य
## ( घोषित दिनांक १६/०३/२०२६ )

आरोपी हा भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ या दंडनिय अपराधाच्या दोषारोपास सामोरा जात आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकिगत खालील प्रमाणे–**

**०२.** दिनांक २८/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०७.३० वाजणेच्या सुमारास फिर्यादी बाबु श्रीपती माने हे भाजीपाला आणणेसाठी आंबेडकर पुतळा, पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे जात असताना त्यांच्या पुढील बाजुने आरोपीने त्याचे ताबेतील टँकर नं. एमएच–१० झेड १८४७ घेऊन आला. जखमी हे बाजुला थांबले असताना आरोपीने सदर टँकरने फिर्यादी यांना धडक दिली व त्यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली. तेथे जमलेल्या लोकांनी जखमी बाबु माने यांना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले. त्यावरून फिर्यादी यांनी पोलीस ठाणे येथे आरोपीविरुद्ध फिर्याद दिली.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन वडगाव पोलीस ठाणेच्या पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा रजिस्टर्ड नं. २२३/२०१५, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदविला.

**०४.** तपासीक अंमलदार श्री. एस. बी. कोळी यांनी तपास केला, घटनास्थळ पंचनामा व नकाशा तयार केला, साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले, वाहनांचे कागदपत्र तपासले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयाबाबत दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले.

**०५.** आरोपीस नि.क्र. १४ प्रमाणे दोषारोपाचा सारांश त्याचे मातृभाषेमध्ये समजावुन सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेची मागणी केल्या वरुन त्याच्या विरुध्द खटला चालविण्यात आला. अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यातून गुन्हादर्शक परिस्थिती निष्पन्न झाल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नि. ६३ वर नोंदविण्यात आला.

**०६.** सदर कामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. एकंदरीत खालील विचारार्थ बाबी माझे समोर निर्माण होतात त्यावरील माझे निष्कर्ष प्रस्तुत कारणमिमांसेच्या आधारे मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे–

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, दि. २८/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०७.३० वाजणेच्या सुमारास आंबेडकर पुतळा, पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे आरोपीने त्याचे ताबेतील टँकर नं. एमएच–१० झेड १८४७ जोरात वेगाने निष्काळजीपणाने, बेदरकारपणे व हयगय करुन अविचाराने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहन चालवले व त्या अन्वये आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २७९ अन्वये गुन्हा केला ? | नाही.. |
| २) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपीने मानवी जीवितास अथवा इतरांच्या वैयक्तीक सुरक्षेतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व | |

हयगयीने नमुद वाहन चालवुन अपघात करुन फिर्यादीला जखमी करणेस कारणीभुत झाला व त्या अन्वये आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३३७ अन्वये गुन्हा केला ? **नाही..**

३) अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपीने मानवी जीवितास अथवा इतरांच्या वैयक्तीक सुरक्षेतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने, नमुद वाहन चालवून अपघात करुन फिर्यादीला जखमी करणेस कारणीभुत झाला व त्या अन्वये आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३३८ अन्वये गुन्हा केला ? **नाही..**

४) अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपीने संबंधीत रस्त्याचे परिस्थितीचा व ट्रॅफीकचा विचार न करता लोकांना धोकादायक ठरेल अशा वेगाने अथवा अशा पध्दतीने वर नमुद वाहन चालवले व त्या अन्वये आरोपीने मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केला ? **नाही..**

५) आदेश काय ? **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.**

## का र ण मी मां सा

**वादप्रश्न क्र. १ ते ४चे विवेचन :–**

**०७.** सदरच्या वादप्रश्नांचे निष्कर्ष एकमेकांवर अवलंबुन असल्यामुळे, विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर वादप्रश्नांचे विवेचन एकत्रीतरित्या करण्यांत येत आहे. प्रकरणात समोर आलेल्या अभियोग पक्षाचा पुरावा पहाता, विचारार्थ वादप्रश्न क्र.१ ते ४ स्वतंत्रपणे चर्चेस घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मी ते एकत्रीतपणे विचारात घेत आहे. संचिकेतील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०८.** साक्षीदार क्र. १ दयानंद बाळासो भोसले हे घटनास्थळ पंच असून त्यांनी सदर पंचनाम्यातील सर्व मजकुर नाकारला. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास अनुकुल अशी साक्ष दिलेली नाही, म्हणुन अभियोगपक्षाने सदर साक्षीदार यांस उलटतपासात

ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारले असता त्यातुनही अभियोगपक्षास अनुकुल ठरेल असे काहीही निष्पन्न झाले नाही. सबब, घटनास्थळ पंचनामा रितसर शाबीत झालेला नाही.

**०९.** साक्षीदार क्र. २ खंडू माने हे जखमी बाबु श्रीपती माने यांचा चुलत पुतण्या, साक्षीदार क्र. ३ लक्ष्मी पोपट माने ही फिर्यादी यांची सुन व साक्षीदार क्र. ४ दिलीप बाबुराव माने हा फिर्यादी यांचा मुलगा आहे. सदर साक्षीदार यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये कथन केले की, फिर्यादी बाबुराव माने यांचा दि. २८/०९/२०१५ रोजी अपघात होऊन त्यांच्या उजव्या पायाच्या पंजावरून टँकरचे चाक गेल्याने ते जखमी झाल्याबाबत कथन केले आहे. तसेच ज्या वाहनामुळे अपघात झाला त्या वाहनाचा क्रमांक एमएच-१० १८४७ होता असे सांगितले आहे. सदर साक्षीदार क्र. २ व ३ यांनी उलटतपासामध्ये हे मान्य केले की, अपघात कसा झाला हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. तसेच ट्रक पायावरुन जाऊन अपघात झाला ही त्यांची ऐकीव माहिती आहे. साक्षीदार क्र. २ ते ४ हे फिर्यादी बाबु माने यांचे नातलग असून अपघाताविषयीची माहिती ही त्यांची ऐकीव माहिती असल्याबाबत त्यांनी स्पष्टपणे कथन केले आहे.

**१०.** साक्षीदार क्र. ५ राहुल सुभाष खंडागळे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये केवळ दि. २८/०९/२०१५ रोजी एका अपघात झालेल्या इसमास दवाखान्यात उपचाराकरिता त्यांच्या रिक्षाने सोडले होते असे कथन केले आहे. साक्षीदार क्र. ५ यांनी अभियोगपक्षास अनुकुल अशी साक्ष दिलेली नाही, म्हणुन अभियोगपक्षाने सदर साक्षीदार यांस उलटतपासात ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारले असता त्यातुनही अभियोगपक्षास अनुकुल ठरेल असे काहीही निष्पन्न झाले नाही.

**११.** साक्षीदार क्र. ६ सुनिल भरत कोळी हे तपासी अंमलदार असून त्यांनी कथन केले आहे की, दि. ०१/१०/२०१५ रोजी त्यांच्याकडे सदर अपघाताचा तपास सोपविण्यात आला होता. त्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांची

तपास टिपणे नोंदवली, आरोपीला कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली, अपघातग्रस्त वाहनाची तपासणी करुन घेतली, आरोपीचा अटक पंचनामा केला व आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदार यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जखमीचा जबाबाखाली लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे असे नमूद आहे. तसेच दि. २८/०९/२०१५ रोजी वडगावध्ये बाजार भरलेला असून सदर दिवशी वाहनांची व लोकांची वर्दळ असते हे त्यांनी मान्य केले आहे. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळावरील व्यावसायीक अथवा दुकानदार यांचा जबाब नोंदवलेला नाही. तसेच घटना घडल्यापासून फिर्याद दाखल करेपर्यंत त्यांनी कोणत्याही साक्षीदारांचे जबाब नोंदवलेले नाहीत असे कथन केले आहे. सदर साक्षीदार यांनी पुराव्यामध्ये मान्य केले आहे की, फिर्याद दिल्यानंतर त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केलेला नाही व अपघातग्रस्त वाहन कोणाच्या मालकीचे आहे, कोणाच्या ताब्यात आहे याबाबत देखील तपास केलेला नाही. तसेच वाहन चालकास कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली नसल्याबाबत त्यांनी कथन केले आहे. साक्षीदार क्र.६ पुढे मान्य करतात की, प्रस्तुत कामातील साक्षीदार हे जखमीचे जवळचे नातेवाईक असून स्वतंत्र किंवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा जबाब नोंदवलेला नाही.

**१२.** भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ प्रमाणे गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोगपक्षाने सिद्ध केले पाहिजे की, घटनेच्या दिवशी आरोपीने आपले ताब्यातील वाहन हे हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे, भरधाव वेगात रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालविले व बाबुराव माने यांना धडक देवून अपघात केला. साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यावरुन अपघात घडल्याचे तसेच फिर्यादी बाबुराव माने हे जखमी झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत असले तरी देखील सदर अपघात हा आरोपीच्या निष्काळजीपणामुळे झालेला आहे असा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. पंच व

तपासी अंमलदार याचे व्यतिरिक्त अभिलेखावरील सर्व साक्षीदार हे जखमी यांचे नातेवाईक आहेत. अभिलेखावरील सर्व साक्षीदार हे जखमींचे नातेवाईक असून इतर कोणतेही स्वतंत्र अथवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोगपक्षातर्फे तपासलेले नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनाबद्दल संशय उत्पन्न होतो व त्याचा फायदा मिळण्यास आरोपी हा पात्र ठरतो.

**१३.** उपरोक्त नमुद चर्चेअंती अभियोगपक्षास हे सिध्द करता आलेले नाही की, सदर अपघात हा आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालविल्याने झाला. अभियोगपक्षाने आरोपीचा गुन्हा सबळ पुराव्याविना सिध्द केला नसल्याने वादप्रश्न क्र १ ते ४ चे निष्कर्ष ‘नकारार्थी’ नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. ५ चे विवेचन :–**

**१४.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, अन्वये शिक्षापात्र दोषारोप शाबीत न झाल्यामुळे आरोपी त्या अपराधातुन मुक्त होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.५ बाबत पुढील प्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येते.

**आ दे श**

**१.** आरोपी शंकर विष्णू पांडागळे यांना भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचा जामीनकतबा रद्द करण्यात येतो.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये ₹१५,०००/– चे जामीन बंधपत्र सादर करावेत. सदर जामीन बंधपत्र सहा महिन्यापर्यंत अस्तित्वात राहतील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.03.16 17:34:43 +0530

**पेठ–वडगांव.** **( जे.एन. भस्मे)**
**दिनांक १६/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पेठ–वडगांव.**